# कौठा येथील सशस्त्र दरोड्यातील आंतर राज्यीय टोळीतील ६ आरोपी पोलिसांच्या ताब्यात

## ४१ लाख ३५ हजार रुपये जप्त;स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**कंधार /प्रतिनिधी**

कंधार तालुक्यातील कौठा येथील गजानन येरावार यांच्या घरावर दि.१५ जून रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास ५ ते ६ चोरट्यांनी शस्त्राचा धाक दाखवुन दरोडा टाकुन सोन्याचे-चांदीचे दागीने व रोकड रक्कम असा एकुण ४१ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने चोरुन नेला होता. दरोडा टाकणाऱ्यांपैकी काही जण नांदेड व काहीजण परभणी येथे असल्याचा सुगावा लागल्याने दि.२३ जून रोजी स्थागुशाच्या वेगवेगळ्या पथकांनी छापे टाकून ६ आरोपीना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ४१ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.



या प्रकरणातील आरोपीतांचा शोध घेवुन अटक करण्याबाबत पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थागुशाची वेगवेगळी पथके तयार करुन आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांकडुन मिळालेल्या माहितीप्रमाणे वरीष्ठांच्या परवानगीने महराष्ट्र, गुजरात व राज्यस्थान या राज्यात जाऊन पोलिसांनी आरोपींची माहिती मिळविली. दि.२३ जून रोजी या गुन्ह्यातील आरोपींपैकी काही आरोपी नांदेड व काही आरोपी परभणी येथे आहेत, अशी माहिती मिळाल्यानंतर स्थागुशाच्या वेगवेगळ्या पथकांनी नांदेड व परभणी शहरातील वेगवेगळ्या ठिकाणावरुन सोनुसिंघ बलविरसिंघ भोंड, २२, रा. उदनानगर, सुरत (गुजरात), जयसिंघ शेरासिंघ बावरी, २० वर्ष रा. दंतेश्वर संतोषवाडी, बडोदा (गुजरात), अरुण नागोराव गोरे, ४५, रा. उस्माननगर, ता. कंधार जि. नांदेड, शेख खदीर शेख मगदुमसाब, ५०,रा. इकबालनगर, धनेगाव ता जि नांदेड, राजासिंघ हिरासिंघ टाक, २२, रा. अण्णाभाऊ साठेनगर, जिंतुररोड, परभणी, गुरुमुखसिंघ हिरासिंघ टाक, २५, रा. नवामोंढा जिंतुररोड, परभणी यांना ताब्यात घेवुन कंधार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कौठा येथील दरोड्याबाबत विचारपुस केली. त्यांनी व यातील फरार आरोपी सतबिरसिंघ टाक रा. अकोला, जसपालसिंघ जुनी रा. परतुर जि. जालना, राजपालसिंघ दुधानी रा. सिंदखेड राजा जि. बुलढाणा, सरदारखान अमीरउल्लाखान रा. पुसद जि. यवतमाळ, मोन्टासिंघ रा. धुळे यांच्या सोबत हा गुन्हा केल्याची कबुली दिली.या आरोपींकडून ४०५ ग्रॅम सोन्याचे दागीने, ५५ ग्रॅम चांदीचे दागीने व ८ लाख ५० हजार रुपयांची रोकड असा एकुण २९ लाख ४३ हजार ४६१ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. या गुन्ह्यात वापरलेली ५ लाख रुपये किंमतीची मारोती स्वीफ्ट कार, इको मॅजीक वाहन व ४५ हजार रुपये किंमतीचे तीन मोबाईल असा एकुण ५ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या आरोपींकडून ३४ लाख ८८ हजार ४६१ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या आरोपींना पुढील तपासासाठी कंधार पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे. उर्वरीत फरार आरोपींना अटक करण्यात येणार असून या आरोपींकडून आणखी गंभीर स्वरुपाचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सपोनि संतोष शेकडे, रविकुमार वाहुळे, पोउपनि आनंद बिचेवार, साईनाथ पुयड, मिलिंद सोनकांबळे यांच्या पथकांनी ही कारवाई केली. सर्व पथकांचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी कौतुक केले आहे.